महाराष्ट्र पोलीस

# स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव.

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

**Email ID:-** sp.jalgaon@mahapolice.gov.in/pilcb.jalgaon@gmail.com

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

जा.क्र.     / स्थागुशा / प्रेसनोट/२०२६.     स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव. दिनांक :- १३/०४/२०२६

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

**प्रति,**

**सर्व संपादक........................**

**.........................................**

**विषय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जळगाव जिल्हा पोलीस दलाचा चोख बंदोबस्त तैनात.**

==०००==

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी साजरी होणारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती जळगाव जिल्ह्यात शांततेत आणि उत्साहात साजरी व्हावी, यादृष्टीने जळगाव जिल्हा पोलीस दलातर्फे जय्यत तयारी करण्यात आली आहे. राजकीय आणि सामाजिक संघटनांकडून हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार असल्याने, पोलीस अधीक्षक कार्यालयाने संपूर्ण जिल्ह्यासाठी विशेष 'बंदोबस्त योजना' तयार केली आहे. सदर बंदोबस्ता करीता जिल्हा भरात २१०० होमगार्ड, एस.आर.पी.एफ.चे ०२ प्लॉटून, १४ स्ट्रॉयकिंग फोर्स, ०८ आर.सी.पी. पथक असा बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.

जळगांव जिल्हयात १७२ ठिकाणी पुतळा पुजन, ४९६ ठिकाणी प्रतीमा पुजन, ०६ ठिकाणी मोटार सायकली रॅली अशा एकूण ४६४ मिरवणुका निघारणार असून जळगांव जिल्हा पोलीस दला तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सहात व शांततेत पार पडावी या करीता सर्व पोलीस स्टेशन कडून शांतता समिती व मोहल्ला कमिटीच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने जळगांव शहरात शनिपेठ, टॉवर चौक, चित्राचौक, रेल्वे स्टेशन या मार्गाने मिरवणुका निघणार असून दि.१४/०४/२०२६ वार मंगळवार या दिवशी दुपारी १६.०० वा. ते रात्री मिरवणुक संपे पावेतो शहरातून वापरणारे अवजड वाहन तसेच बसेसच्या वाहतुक मार्गात पुढील प्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

- चोपडा कानळदा विदगांव पुल कडून , शिवाजी नगर पुलावरुन येणारे सर्व एस.टी.बसेस, अवजड वाहने व चार चाकी, थ्री व्हीलर वाहने यांच्या करीता पर्यायी मार्ग - शिवाजी नगर, दुध फेडरेशन , उतुंग कॉर्नर, गुजराल पेट्रोल पंप, शिवकॉलणी, आकाशवाणी चौक मार्गे वळविण्यात आले आहेत. तसेच जळगांव कडून चोपडा विदगांव कडे जाणाऱ्या सर्व एस.टी.बसेस , अवजड वाहने व चार चाकी, थ्री व्हीलर वाहनांना देखील सदर पर्यायी मार्गे वळविण्यात आले आहेत.
- पिंप्राळा, शाहुनगर, गोविंदा रिक्षा स्टॉप कडून येणारी वाहने कोर्ट चौक मार्गे वळविण्यात आलेली आहेत.
- जळगांव कडून आसोदा - भादली कडेस जाणारी वाहने तसेच परत जळगांकडेस परत येणारी वाहने यांचा पर्यायी मार्ग - मोहन टॉकीज , गजानन मालुसरे, लक्ष्मी नगर, कालींका माता, अजिंठा चौक, आकाशवाणी चौक मार्गे वळविण्यात आलेला आहे.

तसेच पोलीसांकडून नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणीही आक्षपार्ह देखावे तसेच कोणत्याही धर्माच्या व समाजाच्या भावना दुखाविल्या जाणार नाहीत या बाबत देखील खबरदारी घ्यावी.

जळगाव जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस दल पूर्णपणे सज्ज असून सर्व पोलीस ठाण्यांना त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

जनसपंर्क अधिकारी,

पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगांव.